# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू) मुंबई-५१

दूरध्वनी : ६५५६७९९, ६५५०१११ फॅक्स : ६५५६८०५ E.mail – collrmsd@yahoo.com

क्रमांक :- सी/कार्या-३डी/एल-६४०
दिनांक :- /८/२००९ 1 AUG 2009

**वाचले :** १) या कार्यालयाचे आदेश समक्रमांक दि.४/२/२००८
२) महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांचेकडील पत्र क्र. ममेबो/नियोजन/ योगायतन पोर्टस्/१४१६ दि.४/८/२००९

**शुध्दिपत्रक:**

मौजे तुर्भे, न.भू.क्र. २पै येथील २३२९९ चौ.मी. जमिनीपैकी मॅन्ग्रोव्हजविरहित वितरणासाठी उपलब्ध असलेली जमीन महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांना जहाज दुरुस्ती करीता महाराष्ट्र जमिन महसूल (सरकारी जमिनीचे वितरण) नियम १९७१ मधील नियम ३५ नुसार प्रचलित दराप्रमाणे (दि.२९/५/२००६ च्या शासन निर्णयानुसार शिघ्रसिध्द गणकानुसार येणारा २००७ चा दर) येणाऱ्या किंमतीवर प्राईम लॅण्डींग रेट प्रमाणे प्रतिवर्षी भाडे आकारुन अटी/शर्तीवर ३० वर्षाच्या भाडेपट्ट्याने मंजूर करणेंत आली आहे.

प्रकरणी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांनी त्यांचेकडील दि.४/८/२००९ रोजीचे पत्रान्वये या कार्यालयाचे आदेश समक्रमांक दि.४/२/२००८ मधील शर्त क्र. ११ मध्ये सुधारणां करण्यांचे सुचविले आहे.

सबब, मी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा उपरोक्त विषयासंदर्भात शासन निर्णय क्र. जमीन २०००/प्र.क्र. १३५/ज-१ दि.२७/२/२००९ मधील तरतूदी विचारात घेता या कार्यालयाचे दि.४/२/२००८ रोजीचे आदेशातील **अट क्र. ११** मध्ये खालीलप्रमाणें सुधारणां करणेंस मान्यता देत आहे.

| करीता | वाचावे |
|---|---|
| सदर जागा भाडेपट्टेधारक संस्था यांनी इतर कोणतीही व्यक्ती/संस्था यांना विक्री/हस्तांतर अथवा गहाण ठेऊ नये. तसे आढळल्यास शर्तभंग केल्याचे समजून जागा शासनजमा करण्यांत येईल. | सदर जागा भाडेपट्टेधारक संस्था यांनी इतर कोणतीही व्यक्ती/संस्था यांनी **जिल्हाधिकारी यांची पुर्व परवानगी घेतल्याशिवाय** विक्री /हस्तांतर अथवा गहाण ठेऊ नये तसे आढळल्यास शर्तभंग केल्याचे समजून जागा शासनजमा करणेंत येईल. |

L-637-cori-sns

या कार्यालयाचे आदेश दि.४/२/२००८ रोजीचे आदेशातील इतर अटी/शर्ती कायम राहतील.

जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड,
इंडियन मर्कन्टाईल चेंबर्स,
३रा मजला, १४, रामजी भाई कमानी मार्ग,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ०३८

प्रत :- १) मा. अपर मुख्य सचिव(महसूल), महसूल व वन विभाग यांचेकडे त्यांचेकडील ज्ञापन दि. ४/६/२००७ व शुध्दिपत्रक दि.२८/८/२००७ चे अनुषंगाने माहितीकरीता सविनय सादर.
२) संचालक, योगायतन ग्रुप ऑफ कंपनीज, वासवानी मॅंशन, १२० दिनशॉ वाच्छा रोड, चर्चगेट, मुंबई-४०० ०२०
३) तहसिलदार, कुर्ला यांजकडे माहिती व पुढील कार्यवाहीकरिता रवाना.
४) नगर भूमापन अधिकारी, चेंबूर यांजकडे माहिती व पुढील कार्यवाहीकरिता रवाना.

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा

Received
11/8/09

Issued
(2) Two
12/08/09

Issued
(1)
13/08/09

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू) मुंबई-५१

दूरध्वनी : ६५५६७९९, ६५५०१११ फॅक्स : ६५५६८०५ E mail – collrmsd@yahoo.com

क्रमांक :-सी/कार्या-३डी/एल-६४०
दिनांक :- /२/२०१०
22 FEB 2010

**वाचले :** १) शासन महसूल व वन विभागाकडील ज्ञापन क्र. जमीन-२६०४/१२९४/प्र.क्र. २०२३/ज-३ दि.४/६/२००७
२) शासन महसूल व वन विभागाकडील शुध्दिपत्रक क्र. जमीन-२६०४/१२९४/प्र.क्र. २०२३/ज-३ दि.२८/८/२००७
३) या कार्यालयाचे आदेश समक्रमांक दि.४/२/२००८
४) या कार्यालयाचे शुध्दिपत्रक क्र. सी/कार्या-३डी/एल-६४० दि.११/८/२००९
५) नगर भूमापन अधिकारी, चेंबूर यांचे पत्र क्र. न.भू.अ. चेंबूर/न.भू.खाडी/ताबा मोजणी/२००९/जा.क्र. ७० मुलुंड दि.८/२/२०१०
६) अधिक्षक भूमि अभिलेख, मुंबई उपनगर जिल्हा यांचे पत्र क्र. न.भू.स. ३क/तुर्भे/नविन मि.प./का.वि. १३०/१० दि.१६/२/२०१०.

**शुध्दिपत्रक :**

मौजे तुर्भे ता. कुर्ला न.भू.क्र. २पै. येथील २३२९९ चौ.मी. जमिनीपैकी मॅन्ग्रोव्हज विरहित वितरणासाठी उपलब्ध असलेली जमिन महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांना जहाज दुरुस्तीकरीता व माल हाताळणी करीता महाराष्ट्र जमीन महसूल(सरकारी जमिनीचे वितरण) नियम १९७१ मधील नियम ३५ नुसार प्रचलित दराप्रमाणे (दि.१९/५/२००६ च्या शासन निर्णयानुसार शिघ्र सिध्द गणकानुसार येणारा सन २००७ चा दर) येणाऱ्या किमतीवर प्राईम लेण्डींग रेट प्रमाणे प्रतिवर्षी भाडे आकारुन ३० वर्षाचया भाडेपट्ट्याने अटी व शर्तीवर मंजूर करणेत आली आहे.

प्रकरणी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांनी भाडेपट्ट्याची रक्कम आगाऊ जमा केलेनंतर व अटी/शर्ती मान्य असल्याबाबतचे हमीपत्र दिल्यानंतर जागेचा ताबा देणेंची कार्यवाही करणेंचे निर्देश नगर भूमापन अधिकारी, चेंबूर यांना दिल्यानंतर त्यांनी त्यांचे दि.१९/१/२०१० रोजीच्या पत्रानुसार असा अहवाल सादर केला आहे की, अर्जदार यांनी दाखविलेली/सिमांकित मागणी केलेली जागा मौजे तुर्भेच्या खाडीपैकी ५२२८.२ चौ.मी. व तुर्भे गावच्या हद्दिस/शिवेस लागून मोठ्या खाडीपैकी १८०७२.२ चौ.मी. अशी एकुण २३३००.४ चौ.मी. जागेचा ताबा नियमानुसार देणेंचा आहे. परंतू जागेचा अभिलेख/मिळकत पत्रिका नसलेने या कार्यालयाचे आदेश मागविले.

आणि त्या अर्थी नगर भूमापन अधिकारी, चेंबूर व अधिक्षक भूमि अभिलेख, मुंबई उपनगर जिल्हा यांना सदरच्या जागेस नवीन नगर भूमापन क्रमांक देऊन ताबा देणेंबाबत योग्य ती कार्यवाही करणेंचे निर्देश दिले होते.

आणि त्याअर्थी अधिक्षक भूमि अभिलेख, मुंबई उपनगर जिल्हा यांनी उद्देशिकेत अनुक्रमे ६ वर नमूद असलेल्या दि.१६/२/२०१० रोजीच्या पत्रान्वये अहवाल सादर करुन असे कळविले आहे की, ताबा द्यावयाची

जागा ही न.भू.क्र. २पै व ५पै नसून पुर्णत नगर भूमापन हद्दितील खाडीपैकी ५२२८.२ चौ.मी. व नगर भूमापन हद्दिबाहेरील खाडीपैकी १८०७२.२ चौ.मी. अशी एकूण २३३००.४ चौ.मी. मॅन्ग्रोव्हज विरहित जागा असून, सदर २३२९९.० चौ.मी. जागेस पुढील नविन न.भू.क्र. ५०८ असा देऊन धारक सदरी महाराष्ट्र शासन व सत्ता प्रकार 'ग' असा दाखल करावा असे प्रस्तावित केले आहे.

आणि ज्याअर्थी महाराष्ट्र मेरी टाईम बोर्ड यांनी भाडेपट्ट्याची आगाऊ रक्कम या कार्यालयात जमा करुन, अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे हमीपत्रसुध्दा सादर केले आहे. तसेच, अर्जदार यांनी दाखविलेली व सिमांकीत केलेली जागा मॅन्ग्रोव्हज् विरहित खाडीपैकी अशी २३२९९.० चौ.मी. असून त्यास अभिलेख व मिळकत पत्रिका नसल्याने केवळ तांत्रिक मुद्यावर नवीन न.भू.क्र. ५०८ देण्याबाबत अधिक्षक भूमि अभिलेख, मुंबई उपनगर जिल्हा यांनी प्रस्तावित केले आहे.

या सद्यस्थितीचा विचार करुन व शासनाचे अंतिम मान्यतेच्या अधिन राहून मी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा खालीलप्रमाणे भाडेपट्ट्याच्या जागेच्या तपशिलात सुधारणां करणेस मान्यता देत आहे.

| करीता | वाचावे |
| --- | --- |
| मौजे तुर्भे, ता. कुर्ला येथील न.भू.क्र. २पै., ५पै. व खाडीपैकी येथील २३२९९.० चौ.मी. जमिनीपैकी मॅन्ग्रोव्हज विरहित. | मौजे तुर्भे, ता. कुर्ला येथील न.भू.क्र. ५०८ येथील २३२९९.० चौ.मी. मॅन्ग्रोव्हज विरहित जमिन. |

**अटी/शर्ती :**

या कार्यालयाचे आदेश समक्रमांक दि.४/२/२००८ व शुध्दिपत्रक समक्रमांक दि.११/८/२००९ मधील अटी व शर्ती कायम राहतील.

जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हाकरीता

मूळप्रतीवर मा. जिल्हाधिकारी यांची सही असे.

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड,
इंडियन मर्कन्टाईल चेंबर्स,
३रा मजला, १४, रामजी भाई कमानी मार्ग,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ०३८

प्रत :- १) मा. अपर मुख्य सचिव(महसूल), महसूल व वन विभाग यांचेकडे त्यांचेकडील ज्ञापन दि. ४/६/२००७ व शुध्दिपत्रक दि.२८/८/२००७ चे अनुषंगाने माहितीकरीता व पुढील कार्योत्तर मंजूरीकरीता सविनय सादर.

२/- प्रकरणी अर्जदार यांनी दाखविलेली जमिन मौजे तुर्भे न.भू.क्र. २पै व ५पै. नसून ती खाडीपैकी ५२२८.२ चौ.मी. व मोठ्या खाडीपैकी १८०७२.२ चौ.मी. अशी एकूण २३३००.४ चौ.मी.

अशी असल्याने नगर भूमापन अधिकारी, चेंबूर यांनी नकाशा सादर केला व अधिक्षक भूमि अभिलेख, मुंबई उपनगर जिल्हा यांनी सदरच्या खाडीपैकी जमिनीस नविन न.भू.क्र. ५०८ असा दिला आहे सोबत सदरहू दोन्ही अहवालाचे पत्राची प्रत सादर केली आहे. उक्त बाब पडताळता शासन स्तरावर या कार्यालयाने वरीलप्रमाणे केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी देण्यास विनंती आहे.

२) मा. विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, पहिला मजला, नवी मुंबई यांचेकडे माहिती व पुढील कार्यवाहीकरीता सविनय सादर.

३) संचालक, योगायतन ग्रुप ऑफ कंपनीज, वासवानी मॅंशन, १२० दिनशॉ वाच्छा रोड, चर्चगेट, मुंबई-४०० ०२०

४) नगर भूमापन अधिकारी, चेंबूर यांजकडे अधिक्षक, भूमि अभिलेख, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडील दि.१६/२/२०१० चे पत्रासह माहिती व पुढील कार्यवाहीकरिता रवाना.

२/- त्यांनी अधिक्षक भूमि अभिलेख, मुंबई उपनगर जिल्हा यांचे दि.१६/२/२०१० रोजीचे पत्रानुसार प्रश्नांकित जागेस नवीन न.भू.क्र. ५०८ असा देऊन धारक सदरी महाराष्ट्र शासन व सत्ता प्रकार 'ग' असा दाखल केलेली मिळकत पत्रिकेची प्रत सादर करावी.

५) तहसिलदार, कुर्ला यांजकडे अधिक्षक, भूमि अभिलेख, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडील दि.१६/२/२०१० चे पत्रासह माहिती व पुढील कार्यवाहीकरिता रवाना.

स्थळप्रतीवर मा. जिल्हाधिकारी यांची सही आहे.

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हाकरीता

शासन ज्ञापन क्र.जमीन-२६०४/१२९४/प्र.क्र.२०२३/ज-३
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २९ सप्टेंबर, २०११

विषय : जमीन - मुंबई उपनगर जिल्हा
मौजे-तुर्भे, न.भू.क्र.२ पै व ५ पै खाडीपैकी जमीन जहाज दुरुस्ती व माल हाताळणी इत्यादी सुविधा निर्माण करण्यास योगायतन पोर्टस प्रा.लि. यांना देण्यासाठी जमीन महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांना देण्याबाबत.

पहा : १) शासन ज्ञापन, महसूल व वन विभाग क्र.जमीन-२६०४/१२९४/प्र.क्र.२०२३/ज-३, दि.४ जून,२००७
२) शासन शुध्दीपत्रक समक्रमांक दि.२८ ऑगस्ट,२००७
२) जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे क्र.सी/कार्या-३डी/एल-६१६ दि.२२.२.२०१० चे पत्र शुध्दीपत्रक

**शासन शुध्दीपत्रक :** मौ.तुर्भे, ता.कुर्ला, न.भू.क्र.२ पै व ५ पै व खाडीपैकी २३२९९ चौ.मी. जमिन जहाज दुरुस्ती व माल हाताळणी इत्यादी सुविधा निर्माण करण्यास योगायतन पोर्टस् प्रा.लि. यांना देण्यासाठी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांना ३० वर्षाच्या कालावधीसाठी भाडेपट्टयाने देण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. मात्र प्रत्यक्षात जमिनीचा ताबा देताना असे निदर्शनास आले की, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांना मंजूर केलेल्या २३२९९ चौ.मी. जमीन ही प्रत्यक्षात न.भू.क्र.२ पै व न.भू.क्र.५ पै मधील नसून पूर्णतः नगर भूमापन हद्दीतील खाडीपैकी व नगर भूमापन हद्दीबाहेरील खाडीपैकी आहे व त्या जमिनीस नगर भूमापन क्रमांक देण्यात आलेला नव्हता. त्यामुळे सदर जमिनीस शेवटचा न.भू.क्र.५०७ च्या पुढील नवीन न.भू.क्र.५०८ असा दिला असून जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी त्यास मान्यता दिली असून संदर्भ क्र.३ अन्वये शासनाची कार्योत्तर मंजूरी देण्याची विनंती केली आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी यांच्या कार्यवाहीस प्रस्तावास शासनाची कार्योत्तर मंजूरी देण्यात येत असून भाडेपट्टयाच्या जागेच्या तपशीलात वरील संदर्भ क्र.१ व २ येथील आदेशामध्ये खालील सुधारणा करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

| करीता | वाचावे |
| --- | --- |
| मौ.तुर्भे, ता.कुर्ला येथील न.भू.क्र.२ पै, ५ पै व खाडीपैकी येथील २३२९९.० चौ.मी. जमिनीपैकी मॅन्ग्रोव्हज विरहित. | मौ.तुर्भे, ता.कुर्ला येथील न.भू.क्र. ५०८ येथील २३२९९.० चौ.मी. मॅन्ग्रोव्हज विरहित जमिन |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( वै. भू. लटके )
अवर सचिव
महसूल व वन विभाग

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा,
प्रशासकीय इमारत, १० वा मजला,
वांद्रे (पूर्व), मुंबई -४०००५१

कृ.मा.प.

5 OCT 2011

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

क्रमांक :-सी/कार्या-३डी/एल-६४०
दिनांक :- /२/२०१० 2 3 NOV 2011

वाचले : १) शासन महसूल व वन विभागाकडील ज्ञापन क्र. जमीन-२६०४/१२९४/प्र.क्र. २०२३/ज-३ दि.४/६/२००७
२) शासन महसुल व वन विभागाकडील शुध्दिपत्रक क्र. जमीन-२६०४/१२९४/प्र.क्र. २०२३/ज-३ दि.२८/८/२००७
३) या कार्यालयाचे आदेश समक्रमांक दि.४/२/२००८
४) या कार्यालयाचे शुध्दिपत्रक क्र. सी/कार्या-३डी/एल-६४० दि.२२/०२/२०१०.
५) शासन महसुल व वन विभागाकडील ज्ञापन क्र. जमीन-२६०४/१२९४/प्र.क्र. २०२३/ज-३ दि.२९/०९/२०११.

शुध्दिपत्रक (२) :

मौजे तुर्भे ता. कुर्ला न.भू.क्र. २पै. व ५ पै व खाडीपैकी २३२९१ चौ.मी. जमीन जहाज दुरुस्तीकरींता व माल हाताळणी इत्यादी सुविधा निर्माण करण्याकरींता योगायतन पोर्टस् प्रा.लि. यांना देण्यासाठी महराष्ट्र मेरिटाईम बोर्ड यांना ३० वर्षाच्या कालावधीसाठी भाडेपट्टयाने देण्याबाबत उद्देशिकेतील क्र.१ नुसार शासनाने मान्यता दिलेली आहे. मात्र प्रत्यक्षात जमिनीचा ताबा देतांना असे निदर्शनास आले की, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांना मंजूर केलेल्या २३२९१ चौ.मी. जमीन हि प्रत्यक्षात न.भु.क्र.२पै व न.भू.क्र.५पै मधील नसून पूर्णतः नगर भूमापन हद्दीतील खाडीपैकी व नगर भूमापन हद्दीबाहेरील खाडीपैकी आहे व त्या जमिनीस नगर भूमापन क्रमांक देण्यात आलेला नव्हता. त्यामुळे सदर जमिनीस शेवटचा न.भू.क्र.५०७ च्या पुढील नवीन न.भू.क्र.५०८ असा दिलेला आहे, त्याबाबत या कार्यालयाने उद्देशिकेतील नमुद क्र.४ नुसार शुध्दिपत्रक पारित केले होते. सदर शुध्दिपत्रकास शासन महसूल व वन विभाग यांनी उद्देशिकेत नमुद क्र.५ चे शासन ज्ञापनानुसार मान्यता दिली आहे.

प्रकरणी शासनाचे उक्त मान्यतेस अधिन राहून मी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा खालीलप्रमाणे भाडेपट्ट्याच्या जागेच्या तपशिलात सुधारणा करणेस मान्यता देत आहे.

जिल्हाधिकारी,मुंबई उपनगर यांचे कार्यालय, प्रशासकिय इमारत१० वा मजला,शासकिय वसाहत,वांद्रा (पूर्व)मुंबई ५१
कार्यालय९१-२६५५६७९९/२६५५६३८०७फॅक्स २६५५६८०५इमेल mumbaisuburbancollector@mah.gov.in

| करीता | वाचावे |
|---|---|
| मौजे तुर्भे, ता. कुर्ला येथील न.भू.क्र. २१९, ५१९ व खाडीपैकी येथील २३२९९.० चौ.मी. जमिनीपैकी मॅन्ग्रोव्हज विरहित. | मौजे तुर्भे, ता. कुर्ला येथील न.भू.क्र. ५७८ येथील २३२९९.० चौ.मी. मॅन्ग्रोव्हज विरहित जमिन. |

अटी/शर्ती :

या कार्यालयाचे शुध्दिपत्रक समक्रमांक दि.२२/०२/२०११ मधील अटी व शर्ती कायम राहतील.

स्थळप्रतीवर मा. जिल्हाधिकारी यांची सही आहे.

जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हाकरीता

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड,
इंडियन मर्कन्टाईल चेंबर्स,
३रा मजला, १४, रामजी भाई कमानी मार्ग,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ०३८

प्रत :- १) मा. अपर मुख्य सचिव(महसूल), महसूल व वन विभाग यांचेकडे त्यांचेकडील ज्ञापन क्र. जमीन-२६०४/१२९४/प्र.क्र. २०२३/ज-३ दि.२९/०९/२०११. चे अनुषंगाने माहितीकरीता सविनय सादर.
२) मा. विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, पहिला मजला, नवी मुंबई यांचेकडे माहिती व पुढील कार्यवाहीकरीता सविनय सादर.
३) संचालक, योगायतन ग्रुप ऑफ कंपनीज, वासवानी मॅंशन, १२० दिनशॉ वाच्छा रोड, चर्चगेट, मुंबई-४०० ०२०
४) नगर भूमापन अधिकारी, चेंबूर यांचेकडे माहिती व पुढील कार्यवाहीकरिता रवाना.
५) तहसिलदार, कुर्ला यांचेकडील माहिती व पुढील कार्यवाहीकरिता रवाना.

स्थळप्रतीवर मा. जिल्हाधिकारी यांची सही आहे.

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हाकरीता

Received copy 2
23/11/11
23/11/11